**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक** 10/12/2025

**आरोपी लोकसेवक-** 1. उदय दत्तात्रय बारकुल, वय 41 वर्षे पद- निम्नस्तर लिपीक , उपकार्यकारी अभियंता महावितरण कार्यालय, धाराशिव वर्ग-3, 2. भारत व्यंकटराव मेथेवाड, वय 50 वर्षे,पद -उप व्यवस्थापक मानव संसाधन, विभागीय महावितरण कार्यालय, धाराशिव वर्ग-2, 3. शिवाजी सिद्राम दुधभाते, वय 40 वर्षे, पद - उच्चस्तर लिपीक, अधिक्षक अभियंता महावितरण मंडळ कार्यालय, धाराशिव वर्ग-3.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | धाराशिव |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | धाराशिव शहर ता.जि.धाराशिव येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| आलोसे यांचे नाव | 1. उदय दत्तात्रय बारकुल, वय 41 वर्षे,रा.ज्ञानेश्वर मंदीराचे पाठीमागे, महात्मागांधी नगर धाराशिव, व्यवसाय - नोकरी, पद- निम्नस्तर लिपीक , उपकार्यकारी अभियंता महावितरण कार्यालय, धाराशिव (वर्ग-3)<br>2. भारत व्यंकटराव मेथेवाड, वय 50 वर्षे,रा. 05 नंबर पाटी मागे, आम्लेश्वर नगर लातुर. मुळ पत्ता - अन्नपूर्णा आपार्टमेंट पावडेवाडी , काबरानगर नांदेड , व्यवसाय- नोकरी,पद - उप व्यवस्थापक मानव संसाधन, विभागीय महावितरण कार्यालय, धाराशिव (वर्ग-2)<br>3. शिवाजी सिद्राम दुधभाते, वय 40 वर्षे, रा.काकडे प्लॉट शेजारी , शाहूनगर धाराशिव , व्यवसाय- नोकरी, पद - उच्चस्तर लिपीक, अधिक्षक अभियंता, महावितरण मंडळ कार्यालय, धाराशिव (वर्ग-3) |
| लाच मागणी रक्कम | 20000/- |
| लाच स्विक्रती रक्कम | 30000/- रुपये लाच पडताळणी दरम्याण त्यापूर्वी स्विकारल्याचे निष्पन्न झाले. |
| सापळा अधिकारी तपास अधिकारी | श्री.विजय वगरे , पोलीस निरीक्षक, लाप्रवि धाराशिव<br>श्री.योगेश वेळापूरे , पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि धाराशिव |
| लाच मागण्याचा हेतु | यातील आलोसे क्र. 1,2 व 3 यांनी तक्रारदार यांची बदली इच्छित ठिकाणी करुन देण्यासाठी 20,000/- रुपये लाचेची मागणी केली.परंतु तक्रारदारयास रक्कम दयायची इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि.कार्यालय धाराशिव येथे तक्रार नोंदवली होती. |
| थोडक्यात माहिती | यातील मुळ तक्रारदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने दि.26/09/2025 व दि.29/09/2025 रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणीमध्ये आलोसे क्र.1 बारकुल यांनी तक्रारदार यांचेकडून इच्छित ठिकाणी पदस्थापना करणे करीता 20,000/- रुपये व त्याचे मित्राकडून 10,000/- रुपये यापूर्वी घेतल्याचे व त्यातील 10,000/- रुपये आलोसे क्र.02 व 10,000/- रुपये आलोसे क्र.03 यांना दिल्याचे निष्पन्न झालेले आहे.तसेच आलोसे क्र.02 यांनी तक्रारदार यांचेकडून आलोसे क्र.01 यांनी स्विकारलेल्या 20,000/- रुपया पैकी 5000/- रुपये यापूर्वी प्राप्त झाले असल्याचे पंचासमक्ष निष्पन्न झाले आहे व आलोसे क्र.03 यांनी तक्रारदार व त्यांचे मित्र यांची इच्छित ठिकाणी पद स्थापनेचे काम करुन देण्याकरीता आलोसे बारकुल व आलोसे मेथेवाड यांचेसोबत संपर्क साधुन समान उददेश ठेवुन आलोसे क्रमांक 1,2 व 3 यांनी 30,000/- रुपये लाच रक्कम यापूवी स्विकारल्याचे निष्पन्न झाले आहे म्हणुन वरील प्रमाणे गुन्हा दाखल. |

सदरची कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक, श्रीमती माधुरी केदार कांगणे, लाप्रवि छत्रपती संभाजीनगर, मा. अपर पोलीस अधीक्षक, श्री.शशिकांत सिंगारे, लाप्रवि छत्रपती संभाजीनगर, मा.पोलीस उप अधीक्षक, श्री. योगेश वेळापुरे, ला.प्र.वि. धाराशिव यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक विजय वगरे यांनी केली आहे त्यांना सदर कार्यवाही कामी पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे सोबत, पोहेकॉ/जाधव , पो.अं.सिध्देश्वर तावसकर, शशिकांत हजारे, जाकीर काझी, विशाल डोके ला.प्र.वि.धाराशिव युनिट यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागतर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचार संबंधी माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव यांचेशी संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता** :- **लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव**

**संकेतस्थळ** :- 1. acbwebmail@mahapolice.gov.in
2. dysposmanabad@gmail.com

**ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन** :- acbmaharashtra.net

**टोल फ्रि क्रमांक** :- 1064

**दुरध्वनी क्रमांक** :- 02472-222879

**पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि, धाराशिव** :- 1) 9049519833
2) 9270231064

10/12/2025

(योगेश भालचंद्र वेळापुरे)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव.

कार्यालय पोलीस उप अधीक्षक
अँटी करप्शन ब्युरो,धाराशिव
सत्यमेव जयते